
म. ग्रं. सं. ठाणे
विषय - चरित्र
सं. क्र. १३३८

६५



REFBK-0014431



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ...

भारताचे रणझुंजार माला : पुष्प ३ रें

REFBK-0014431

# महादजी शिंदे

लेखिका :—
सौ. प्रतिभा प्रभाकर चितळे
बी. ए. ( ऑनर्स )

प्रथमावृत्ति १९६५

मूल्य रु. १·२५

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

मुद्रक
**वि. ग. माटे**
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ सदाशिव पेठ, पुणें ९.

प्रकाशक :
**अ. ज. प्रभु**
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार पेठ, पुणें २.

प्रणाम

जयीं उजाळिल्या जीवांच्या ज्योति,
अन् तेजाळलें स्वदेश-मंदिर.
जीवित अपुलें मानुनि तृणवत्
मिळविली जयांनीं थोर दिगंता कीर्ति—
त्या नरवीरां रणझुंजारां
असोत अमुचे लाख प्रणाम

## महादजी शिंदे

* धन्य धन्य पाटीलबाबा
* फकिरी दौलत
* पानिपतचा सूड
* इंग्रजांशीं पहिली सलामी
* पुन्हां इंग्रज
* दिल्लीवर वर्चस्व
* शिंद्यांचे बळ कवायती पलटणींत
* अखेर—

# प्रकाशकाचे दोन शब्द

आपल्या भारताची परंपरा थोर, संस्कृतीही थोर. हा देश ऋषिमुनींचा, तसाच थोर सम्राटांचा. शूरांनीं याची शान वाढविली; विद्वानांनीं याची मान उंचावली. कारागिरांनीं याला वैभवसंपन्न केलें; कष्टकऱ्यांनीं याच्या मातीचें सोनें केलें.

असा आहे आपल्या भारताचा थोर इतिहास. अशोक-समुद्रगुप्तांनीं त्याचीं पानें रंगविलीं आहेत. प्रताप-शिवाजींनीं त्याला सोनेरी किनार चढविली आहे. लाल-बाल-पाल या त्रिमूर्तींच्या त्रिगुणात्मक कर्तृत्वाच्या फुलोऱ्यानें तो फुलला आहे; आणि गांधी-सुभाषांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें तो तेजाळला आहे.

आम्हीही त्यांच्या प्रयत्नांत सहभागी होऊं इच्छितों. आमचें लक्ष्य संस्कार. आमची दृष्टि भावी पिढीवर खिळलेली. आम्हांला आमची भावी पिढी सर्व दृष्टींनीं सुदृढ व्हावीशी वाटते. ती ज्ञानी व्हावी तशी बलवानही व्हावी. ती बुद्धिवादी व्हावी तशी झुंजारही व्हावी. ती यत्नवादी व्हावी तशी श्रमवादीही व्हावी.

तरी पण आज आम्हांला हवे आहेत रणझुंजार. केवळ पोषाखी नकोत. वृत्तीचे हवेत. त्यासाठीं आमचा हा उपक्रम. आमचे हे रणझुंजार अखिल भारताचे प्रतिनिधि आहेत. ते कोणा एका विशिष्ट जातीचे वा पंथाचे नाहींत. त्यांचा परिचय करून घ्या व त्यांची झुंजार वृत्ति आपल्या अंगीं बाणवा.

आमचे बाल आणि तरुण वाचक या रणझुंजारांचें सहर्ष स्वागत करतील अशी आम्ही आशा बाळगतों.

आमच्या या उपक्रमाला अनेक मित्रांनीं साहाय्य केलें आहे. त्यांतही विशेष आपुलकीनें साहाय्य करणारे पुण्यांतील प्रथितयश इतिहास-संशोधक व शिव-शाहीर श्रीमान् बाबासाहेब पुरंदरे यांचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. त्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. तसेंच ही माला गुंफण्याच्या कामीं ज्या ज्या मित्रांचें आम्हास वा लेखकांस साहाय्य झालें त्या त्या सर्वांचें ऋण व्यक्त करून आम्ही आमचें हें निवेदन पुरें करितों.

— प्रकाशक

# निवेदन

'रणझुंजारां'चें व्यक्तिदर्शन घडविण्याची मूळ कल्पना माझे वडील श्री. व. द. ताम्बे यांची. इतिहास हा त्यांचा आवडता विषय. त्यांचा पिंड शिक्षकाचा. हा विषय मुलांना आवडेल अशा पद्धतीनें मांडण्याची त्यांची विलक्षण हातोटी. त्यामुळेंच 'रणझुंजारां'ची ही एक मालिका मुलांसाठीं तयार करण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांचीं टिपणेंही लगोलग तयार झालीं. पण सरकारी नोकरींतील बंधनांमुळें आणि विविध जबाबदाऱ्यांमुळें त्यांच्या हातून ही मालिका पूर्णपणें गुंफली जाणें अशक्य झालें.

मालिकेची ही चांगली कल्पना केवळ पूर्वतयारीवरच थांबावी ही गोष्ट आम्हां मुलींना खटकली. मी व माझी धाकटी बहीण सौ. शशिकला ओक आम्ही दोघींनींच निर्णय घेतला आणि वडिलांचें हें आवडतें कार्य हातीं घेतलें. एका अर्थी आमचें हें धाडसच होतें. पण वडिलांचें समर्थ पाठबळ असल्यामुळें आम्ही धैर्यानें पाऊल टाकलें.

आम्ही दोघी भाषेच्या विद्यार्थिनी. भाषेवर आमचें प्रभुत्व नसलें तरी लेखनाची आवड दोघींनाही आहे. आणि कांहीं झालें तरी वडिलांचा वारसा आम्ही मुली घेणारच! त्यांत हें कथावाङ्मय. चिंतनाचा आणि पांडित्याचा येथें काय उपयोग? गोष्ट कशीही असो. मुलांना ती आवडतेच. पराक्रमी वीरांच्या गोष्टी तर त्यांना फारच आवडतात. तेव्हां आमचा हा प्रयत्न मुलांना तरी खचितच रुचेल. तरीपण तिखट तलवारींचे घाव धारदार शब्दांनींच वेंचले पाहिजेत. निर्जीव शब्दांनीं ते बोथट नाहीं का ठरायचे? रणझुंजारांच्या झुंजार कृति जिवंत शब्दांतच रेखाटण्याचा आमचा प्रयत्न आहे. तो कितपत सफल झाला आहे तें वाचक ठरवतीलच.

आमचे प्रकाशक मित्र श्री. प्रभु यांचीच सारी प्रेरणा व धडपड. त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच!

—लेखिका

# अलिजाबहाद्दर माधवराव ऊर्फ महादजी शिंदे




" मुगुटमणि ते पाटिलबावा ।

कोठवर त्यांचा प्रताप गावा ।

दर्शनमात्रें तापच जावा ।

नवस नवसितां फळास यावा ।

हरहमेशा शत्रुशीं दावा ।

माहित सगळा मराठी कावा ।
हुशार फौजा लढाई लावा ।
जिंकुनी हिंदुस्थान परतले ।।

चवदा वर्षें बहुत भागले ।
म्हणुनि शिरस्ते पाहुनि मागले ।
तरतुदीस कारभारी लागले ।
उंचउंच पोशाख चांगले ।
देऊनि फार मर्जीनें वागले ।
भेटीसमयीं जंबुर डागले ।
मग तोफांचे बार शिलगले ।
सूर्यबिंब अगदीं झांकलें ।।

राव जेव्हां नालकींत बसले ।
कृष्ण तेव्हां ते जनांस दिसले ।
अर्जुन पाटिलबावा भासले ।
पायपोस पदरानें पुसिले ।
चरणीं मिठी माराया घुसले ।
कर प्रभूंनीं बगलेंत खुपसले ।
इमानी चाकर नाहींत असले ।
धन्य धनी आणि धन्य दास ते ।। ”

— शाहीर प्रभाकर

शाहीर प्रभाकरांनीं कवनांत वर्णन केलेले मराठेशाहीचे अर्जुन म्हणजे सुप्रसिद्ध सेनापति महादजी शिंदे हे होत. पानिपतच्या

## १ फकिरी दौलत

भयंकर कत्तलीतून दोन महापुरुष कसेबसे वांचले आणि परत महाराष्ट्रांत आले. एक महादजी शिंदे आणि दुसरे नाना फडणीस. पहिले तलवारबहाद्दर आणि दुसरे लेखणीबहाद्दर. उत्तर पेशवाईत दोघांनींहि आपली शस्त्रें परजलीं आणि पानिपतावर मराठ्यांच्या सार्वभौमत्वाला लागलेला कलंक धुवून टाकला.

महादजी शिंदे वांचले ते केवळ दैवाची कृपा म्हणूनच. पानिपतावर झालेल्या पळापळींत तेहि पळूं लागले. एक पठाण सैनिक त्यांचा पाठलाग करूं लागला. त्या पठाणाला त्यांची भीमथडी घोडी फार आवडली होती असें म्हणतात. पळतां पळतां एका नाल्यापार उडी घेतांना ती घोडी खालीं पडली. महादजीहि पडले. तेवढ्यांत त्या पठाणानें त्यांना गांठलें. तलवारीच्या एका घावानें त्यानें त्यांचा पाय छाटून टाकला आणि घोडी घेऊन तो पळून गेला. महादजी तिथेंच विव्हळत पडून राहिले. इतक्यांत भिस्त्याच्या वेषांत येणाऱ्या राणाखानानें त्यांना पाहिलें. तो मराठ्यांच्याच बाजूचा एक सैनिक होता. त्यानें महादजींना ओळखलें आणि आपल्या बैलावर बसवून दक्षिणेंत सुरक्षित आणलें. अशी ही या पराक्रमी पुरुषाच्या उदयाच्या पूर्वीची कहाणी आहे. महादजी शिंदे 'सरदार' म्हणून नांवाला आले ते यानंतरच्याच काळांत.

'पानिपता'नंतर थोड्याच दिवसांत नानासाहेब पेशवे वारले. माधवरावांनी पेशवाईचीं वस्त्रें स्वीकारलीं. परंतु तें वयानें लहान असल्यामुळें त्याचे चुलते राघोबादादा कारभार चालवीत.

शिंदे घराणें बाजीराव पेशव्यांनीं पुढें आणलें. राणोजी शिंदे हा या घराण्यांतला पहिला सरदार. त्याच्या औरस वारसदारांपैकीं जयाप्पा, दत्ताजी, तुकोजी, जनकोजी हे सगळेच पानिपतच्या लढाईत कामास आले. अनौरस संततिपैकीं मानाजी फाकडे आणि महादजी हे दोघेच हयात होते. मानाजी फाकडे राघोबाच्या मर्जीतील, म्हणून त्याला सरदारकी देण्याचा घाट राघोबानें घातला. परंतु माधवराव महादजीची योग्यता जाणून होता. कारभार राघोबाच्या हातीं असेपर्यंत माधवराव कांहीं करूं शकला नाहीं. पुढें निजामाशीं झालेल्या लढाईत महादजीनें खूप पराक्रम गाजविला. या वेळीं कारभारहि माधवरावाच्या हातीं आला. त्याबरोबर माधवरावानें सरदारकीचीं वस्त्रें मानाजीकडून काढून महादजीला दिलीं. शिंद्यांची सारी दौलत माळव्यांत होती. महादजीला ही दौलत एका फकीराच्या कृपेनें मिळाली असें म्हणतात. म्हणून तिला फकीरी दौलत असें नांव आहे. सरदारकीचीं वस्त्रें मिळतांच महादजीनें तिची सारी व्यवस्था लावली आणि तो पेशव्यांच्या तैनातींत रुजू झाला. यानंतरच्या काळांत त्यास 'सरदार माधवराव किंवा पाटीलबाबा' असें लोक म्हणूं लागले.

पानिपतच्या पराभवामुळें हिंदुस्थानांतून मराठ्यांचें वजन कमी झालें. तें पुन्हां प्रस्थापित करण्यासाठीं माधवरावानें एक मोठी फौज तयार केली. रामचंद्र गणेश कानडे हा त्या फौजेचा मुख्य सेनापति. त्याच्या मदतीला विसाजी कृष्ण बिनीवाले, महादजी शिंदे आणि तुकोजी होळकर यांनाहि देण्यांत आलें. पावसाळा सुरू होण्याच्या आंत ही सर्व फौज नर्मदापार झाली. पानिपत झाल्यानंतर उत्तरेंत मराठ्यांनीं काढलेली हीच पहिली बडी मोहीम होय.

## २ पानिपतचा सूड

या वेळीं दिल्लींतील राजकारण पार बदलून गेलें होतें. बादशहा शहाआलम हा इंग्रजांच्या आश्रयाला अलाहाबाद येथें जाऊन राहिला होता. खुद्द दिल्लींत मराठ्यांचा कट्टा दुष्मन नजीबखान रोहिला याचें अधिराज्य होतें. सुरजमल जाट मरण पावला होता. व त्यामुळें नजीबखानाला उत्तरेंत कोणीहि प्रबळ शत्रु उरला नव्हता. मराठे चंबळा नदी उतरून आपल्यावर चाल करून येतील अशी यत्किंचितहि कल्पना त्याच्या मनांत नव्हती. किंबहुना पानिपतावर एवढा भयंकर नाश ओढवल्यावर मराठे पुन्हां उत्तरेकडे फिरकणारहि नाहींत, अशी त्याची ठाम समजूत होती. त्यामुळें मराठ्यांच्या बाबतींत तो फारच गाफील राहिलेला होता.

मराठ्यांचें सर्व सैन्य माळव्यांत एकत्र झालें. तेथून तें थेट दिल्लीकडेच जाण्याची प्रथम योजना होती. परंतु जयपूर, जोधपूर

वगैरे ठिकाणच्या रजपूत संस्थानिकांनीं पेशव्यांची खंडणी बंद केली होती. मराठे पुन्हां वर येत नाहींत या कल्पनेनें त्यांनीं उत्तरेंतील मराठ्यांच्या मुलखांत धुमाकूळहि घातला होता. तेव्हां त्यांच्यावर वचक बसविणें आवश्यक वाटल्यावरून मराठ्यांचें सैन्य प्रथम तिकडे गेलें. मराठ्यांच्या पुढें रजपुतांचा निभाव लागला नाहीं आणि त्यांनीं भराभरा खंडणीची बाकी देऊन टाकली. यानंतर मराठ्यांचें सैन्य जाटांच्या प्रदेशांत घुसलें. जाटांचा पराभव करून मराठ्यांनीं त्यांच्याकडून ६५ लाख रुपये खंडणीदाखल वसूल केले. उत्तरेंत मराठ्यांचें वर्चस्व अशा रीतीनें पुन्हां वाढूं लागले. आणि तें मराठ्यांचा कट्टा दुष्मन नजीबखान रोहिला ह्याच्या पारिपत्यानें बळकट होणार होतें.

परंतु इतक्यांत एक नवीनच संकट ओढवलें. नजीबखानावर चालून जावें कीं नाहीं, ह्या बाबतींत मराठ्यांच्या सेनापतींमध्येंच मतभेद निर्माण झाले. होळकर हे पूर्वीपासूनच नजीबखानाचे पक्षपाती होते. त्यामुळें ते या बाबतींत मूग गिळून बसले. महादजी शिंदे ह्यांचें एकट्याचेंच धोरण या बाबतींत पक्कें होतें. त्यांचे बंधु आणि पुतण्या ह्यांच्या मृत्यूचा सूड उगविल्याखेरीज त्याना शांतता लाभली नसती. आणि त्यामुळें रोहिल्यांचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा त्यांचा निश्चय झाला होता. त्यांच्यासारख्या थोर सरदाराची मसलत झुगारून देणें विसाजी कृष्णाला बरोबर वाटलें नाहीं. या वेळीं रामचंद्र गणेश कानडे दक्षिणेंत गेलेले असल्यामुळें फौजेचीं सर्व सूत्रें त्यांच्याच हातांत होतीं. त्यांनीं दक्षिणेंत खास

जासूद पाठवून ह्याबाबतींत माधवराव पेशव्यांचा सल्ला घेतला. माधवरावांनीं महादजीच्याच म्हणण्याचा पाठपुरावा केला.

नजीबखानाच्या भीतीनें दिल्लीचा बादशहा शहाआलम अलाहाबादला इंग्रजांच्या आश्रयानें राहिला होता. मराठ्यांचा वाढता जोर पाहून त्यांच्याशीं सख्य करावें आणि त्यांच्या साहाय्यानें नजीबखानाला दिल्लीच्या तख्तावरून हुसकावून लावून आपण त्या तख्तावर बसावें, असे मनसुबे तो रचीत होता. ज्या इंग्रजांच्या आश्रयाला तो होता, त्यांच्यांत त्याला पुन्हां दिल्लीचें तख्त प्राप्त करून देण्याची धमक अद्याप आलेली नव्हती. त्यामुळें मराठ्यांच्या मदतीची आशा त्याला वाटूं लागली. त्या दृष्टीनें त्यानें प्रयत्नहि सुरू केले मराठ्यांनीं आपल्याला दिल्लीच्या तख्तावर बसविल्यास त्यांना भरपूर खंडणी देण्याचें त्यानें कबूलहि केलें.

बादशहा आणि मराठे एक होऊन दिल्लीवर चाल करून येणार असें दिसतांच नजीबखान घाबरला आणि थोड्याच दिवसांत मराठ्यांच्या दहशतीमुळें तो एकाएकीं मरण पावला. नजीबखानाच्या मृत्यूबरोबर दिल्लीतील मुत्सद्देगिरी संपली. त्याचा मुलगा झबेताखान यानें कारभार हातीं घेतला खरा; पण त्याच्या ठिकाणीं धमकहि नव्हती आणि दूरदृष्टीहि नव्हती. त्यानें बादशहाची नेमणूकच बंद करून टाकली. त्यामुळें बादशहा अधिकच संतापला आणि त्यानें मराठ्यांस रोहिल्यांचें पारिपत्य करण्याची विनंती केली.

महादजी शिंदे तर याच संधीची वाट पाहात होते. त्यांची फौज ताबडतोब अंतर्वेदींत शिरली आणि त्यांनीं रोहिलखंडाचा बराचसा भाग काबीज केला. झबेताखान शुक्रतालच्या किल्ल्यात जाऊन लपून बसला.

इकडे दिल्लीलाहि मराठ्यांना कोणीच प्रबल शत्रु राहिला नाहीं. तेंहि शहर त्यांनीं जिंकलें. आणि बादशहास दिल्लीच्या



बादशहाला तख्तावर बसविलें

गादीवर नेऊन बसविलें. २५ डिसेंबर १७७१ रोजीं बादशहाची स्वारी मोठ्या समारंभानें दिल्लींत आली. बादशहानें पूर्वीं कबूल केल्याप्रमाणें मराठ्यांस भरपूर खंडणी दिली व शिवाय पानिपतच्या पूर्वीं त्यांच्या ताब्यांत असलेला सर्व प्रदेश पुन्हां त्यांना मिळाला.

बादशहाला दिल्लीच्या तख्तावर नेऊन बसविण्याची ही महत्त्वाची कामगिरी सेनापति महादजी शिंदे यांनीं पार पाडली. या गोष्टी-मुळें मराठ्यांचें आसन स्थिर झालें खरें; परंतु अद्याप महादजींची प्रतिज्ञा पुरी झाली नव्हती. त्यांना नजीबखानाचें घराणें जमीन-दोस्त करावयाचें होतें. या कामगिरीवर ते आतां निघाले. महाद-जींची ही मोहीम त्यांच्या उत्कृष्ट सेनापतित्वाची निदर्शक समजली जाते. रोहिल्यांवर चाल करून जायचें महादजींनीं ठरविलें आणि आपली फौज गंगेपर्यंत आणली. परंतु त्यांना असें दिसून आलें कीं, गंगेवरील सर्व उतार शत्रूनें रोखून धरले आहेत. थोडा विचार करून महादजींनीं एक युक्ति मनांत योजली. शत्रूला हुलकावणी देण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें आपण गंगेच्या उताराच्या दिशेनें जात नसून दुसऱ्याच वाटेनें जात असल्याचा देखावा त्यांनीं निर्माण केला. अर्थातच परती-रावरची रोहिल्यांची फौज महादजींना अडविण्यासाठीं निघाली. थोड्याच वेळांत शत्रूला गुंगारा देऊन महादजी सैन्यासह गंगापार झाले. इकडे रोहिल्यांची फौज या प्रकारानें गोंधळली, गडबडली. महादजींच्या सैन्यानें रोहिलखंडांत प्रवेश केला.

मराठ्यांपुढें मैदानांत आपला निभाव लागणार नाहीं हें पाहून झबेताखान शुक्रतालच्या किल्ल्याच्या आश्रयास जाऊन राहिला. याच शुक्रतालच्या छावणींत राहून पूर्वीं नजीबखानानें शिंद्यांशीं कित्येक महिनेपर्यंत टक्कर दिली होती. त्या वेळीं शिंद्यांचें त्यापुढें कांहीं एक चाललें नाहीं. तेव्हां आपणहि तसेंच केलें तर विजयी

होऊं असें झबेताखानाला वाटलें. पण बापाला जें साधलें तें मुलाला साधेलच याचा काय नेम? मराठ्यांनीं शुक्रतालाला वेढा दिला. या वेळीं त्यांच्यापाशीं मोठमोठ्या तोफा होत्या. त्यांचा मारा सुरू होतांच झबेताच्या फौजेची दाणादाण उडाली. रोज हजारों शिपाई मरूं लागले. अन्नदाण्याचीहि पंचाईत होऊं लागली. तेव्हां त्याचा धीर सुटला आणि एका काळोख्या रात्रीं तेथून तो पळाला आणि पुन्हां गंगा उतरून तो बिजनार जिल्ह्यांत आला. मराठ्यांनींहि ताबडतोब त्याचा पाठलाग सुरू केला. नदीच्या पलीकडे त्यानें ठेवलेल्या तोफांना मराठ्यांनीं दाद दिली नाहीं. उलट त्यांनीं त्याच्या तोफा तर हस्तगत केल्याच आणि त्याच्या फौजाहि धुळीस मिळविल्या. सर्व बिजनार जिल्हा त्यांनीं लुटून उध्वस्त केला. झबेताखान पुन्हा पळूं लागला. त्याला पळतां भुई थोडी झाली मराठे पाठलाग करीतच होते. त्यांनीं नजीबगडावर हल्ला करून तें शहर जिंकलें. इतकेंच नव्हे तर तें लुटून, जाळून त्याचा विध्वंस केला. तेथें नजीबखानाची कबर होती, तीहि फोडून छिन्नविच्छिन्न केली. अशा रीतीनें नजीबखानावरचा सूड त्यांनीं पुरता उगवून घेतला.

नंतर ते फत्तरगडावर चालून गेले. तेथें पानिपतच्या वेळीं नजीबनें मराठ्यांची लुटून नेलेली अपार संपत्ति सांठवून ठेवलेली होती. मराठ्यांनीं फत्तरगड जिंकला आणि ती सर्व संपत्ति त्यांच्या हातीं आली. झबेताचीं बायकामुलेंहि त्या किल्ल्यांत सांपडलीं. त्यांस त्यांनीं कैद केलें. पानिपतावर गेलेल्या मराठ्यांच्या कांहीं बायकाहि त्या ठिकाणीं सांपडल्या.

रोहिल्यांचा तिसरा महत्त्वाचा किल्ला म्हणजे घोसगड. मराठ्यांनीं तोहि जिंकला. अशा रीतीनें सर्व रोहिलखंडावर मराठ्यांचा अंमल प्रस्थापित झाला. मराठ्यांची फौज सर्व रोहिलखंडभर पसरली होती. या वेळीं मराठ्यांची प्रत्येक हालचाल पानिपतचें उट्टें काढण्याच्या दृष्टीनें होत होती. आणि तें काढण्यांत महादजींनीं किंवा त्यांच्या शूर सैनिकांनीं थोडासुद्धां आळस केला नाहीं. रोहिले लोक एवढे शूर, परंतु त्यांनीं खाल्लेल्या जबरदस्त मारामुळें ते इतके भ्याले कीं, मराठ्यांची फौज त्यांच्या मुलखावर चालून येतांच ते सैरावैरा पळत सुटले. वास्तविक त्यांचे तळ कांहीं कमी बळकट नव्हते. त्यांच्या प्रदेशांत सुरक्षित ठिकाणेंहि पुष्कळ होतीं. तरीसुद्धां मराठ्यांचा एखाद दुसरा स्वार दृष्टीस पडल्याबरोबर ते आपले किल्ले आणि तळ सोडून धूम पळूं लागले. मराठ्यांना प्रतिकार करण्याची एकाचीहि छाती झाली नाहीं. हफीज रहमतखान, फत्तेखान, महिबुल्लाखान यांसारखे बडे बडे सरदारहि मराठ्यांच्या भीतीनें तराईच्या रानांत पळून गेले.

इतक्यांत पावसाळा सुरू झाला. आणि मराठ्यांची कांहीं फौज दिल्लीला परत गेली. पावसाळा संपल्यावर पुन्हां त्यांची स्वारी होईल, ही रोहिल्यांस भीति होतीच. त्यामुळें त्यांनीं त्यांचा पूर्वीचा शत्रु सुजाउद्दौल्ला याच्याकडे जाऊन मदतीची याचना केली. सुजा व इंग्रज एक झाले होते. तेव्हां त्यांनीं रोहिल्यांकडून

४० लक्ष रुपये घेऊन त्यांना मराठ्यांविरुद्ध मदत करण्याचें आश्वासन दिलें. तें त्यांनीं कितपत पार पाडलें हें पुढें दिसेलच.

झबेताखानाकडे बादशहाचें 'मीरबक्षी' हें पद होतें. तें त्याच्याकडून काढून पेशव्यांच्या नांवें करावें, अशी महादजीची फार इच्छा होती. पण मराठ्यांचें दुर्दैव त्यांना प्रत्येक ठिकाणीं आड यावयाचें होतें. याचवेळीं दक्षिणेंत श्रीमंत माधवराव पेशवे मरण पावले आणि मराठ्यांच्या उत्तरेंतील राजकारणाला पुन्हां एकदां खो बसण्याची वेळ आली. तरी पण अवघ्या दहा वर्षांच्या अवधींत मराठ्यांनीं आणि विशेषतः महादजी शिंद्यांनीं पानिपतावर झालेलें नुकसान भरून काढलें. इतकेंच नव्हे तर दिल्लीच्या बादशहाला आपल्या संरक्षणाखालीं ठेवण्याचा पराक्रमहि करून दाखविला.

## ३ इंग्रजांशीं पहिली सलामी

माधवरावांच्या अकाली मृत्यूमुळें मराठ्यांच्या वाढत्या शक्तीस चांगलाच धक्का बसला. पानिपतच्या लढाईपेक्षांहि जास्त नुकसान माधवरावांच्या मृत्यूमुळें झालें होतें. या दुर्दैवी घटनेनंतर पेशव्याचें घर दुहीनें पोखरलें गेलें आणि मराठशाहीला एक प्रकारें उतरती कळाच लागली. इतके दिवस मराठमंडळ हें पेशवाईच्या एका सूत्रांत गोंवलेलें होतें. आतां त्या मंडळांतील प्रत्येक सरदार स्वतंत्रपणें वागूं लागला. त्यांना एकत्र आणणारा नेता लाभला

नाहीं. ज्या सरदारांच्यांत मराठी साम्राज्याच्या विस्ताराची जाणीव होती, त्यांनीं आणि फक्त त्यांनींच त्या ध्येयानें प्रेरित होऊन कार्य केलें. अशा सरदारांमध्यें परशुरामभाऊ पटवर्धन आणि महादजी शिंदे यांचा प्रमुखपणें समावेश होतो.

महादजींनीं आपलें कार्यक्षेत्र उत्तर हिंदुस्थानांत ठेवलें, तर भाऊंनीं त्यासाठीं दक्षिण हिंदुस्थान निवडलें. दोघेहि दोन दिशांना गेले, तरी दोघांचीहि करामत मराठी साम्राज्याचा विस्तार करणारीच होती. अर्थात् त्यालाहि तत्कालीन परिस्थितीप्रमाणें स्वार्थाचें गालबोट अधून मधून लागलेलें दिसतें.

श्रीमंत माधवरावांचा मृत्यु होऊन एक वर्षसुद्धां उलटलें नाहीं, तोंच श्रीमंत नारायणराव पेशव्यांचा वध झाला. आणि पुण्यांतच दोन पक्ष निर्माण होऊन ते परस्परांविरुद्ध कारस्थानें करूं लागले. एक पक्ष, प्रत्यक्ष स्वतःच्या पुतण्याचा खून करून अन्यायानें गादी मिळवणाऱ्या राघोबाचा. सखारामबापूंसारखी कारस्थानी मंडळी या पक्षांत होती. दुसरा पक्ष बारभाईचा. नाना फडणीस हे त्याचे प्रमुख. नारायणरावांची गरोदर पत्नी गंगाबाई, हिला पुरंदर किल्ल्यावर ठेवून तिच्या मुलाच्या नांवानें कारभार चालविण्याची या पक्षाची उमेद होती. अर्थातच राघोबाच्या पक्षाचा नायनाट केल्याशिवाय ही गोष्ट शक्य नव्हती. बारभाईच्या उद्योगांचें हेंच एक मुख्य सूत्र होतें. बारभाईच्या पक्षांत महादजी शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन, हरिपंत फडके, त्रिंबकराव पेठे, गायकवाड, होळकर वगैरे सर्व प्रमुख मंडळी सामील झाल्यामुळें

राघोबाचा पक्ष कमजोर झाला आणि त्याला पुणें सोडून पळून जावें लागलें. राघोबा स्वतः शूर सरदार होता. परंतु तो तितकाच व्यवहारशून्य व स्वार्थी होता. त्याच्या या दोषांमुळेंच मराठशाहीचें अपरिमित नुकसान झालें. राघोबानें पेशवा व्हावें, ही महत्त्वाकांक्षा त्याच्यापेक्षांहि त्याची बायको आनंदीबाई हिच्या ठिकाणीं अधिक प्रखर होती. 'पेशव्याची बायको' म्हणवून घेण्यांतच तिचा सारा आनंद सांठविलेला होता. राघोबा तिच्या अर्ध्या वचनांत असे. आणि म्हणूनच पेशवेपद मिळविण्यासाठीं तो नको नको तीं कारस्थानें करी. इंग्रजांचा मराठ्यांच्या राजकारणांत प्रवेश होणें, हा राघोबाच्याच कारस्थानाचा भाग आहे. यांतच मराठशाहीचा नाश आहे, ही गोष्ट त्या मंदबुद्धीच्या राघोबास कधींहि उमगली नाहीं. बारभाईच्या पुढें निभाव न लागल्यामुळें तो इंग्रजांच्या आश्रयास गेला. इंग्रज एक नंबरचे संधिसाधू. मराठ्यांच्या एकजुटींत भगदाड पडलेलें पाहून त्यांना हर्ष होत होताच. आतां तर राघोबा शरण आल्यामुळें इंग्रजांना मराठ्यांच्या राजकारणांत शिरण्याची केवढी तरी संधि मिळाली. मुंबईच्या इंग्रजांनीं रघुनाथरावाशीं तह केला, त्यांत राघोबानें त्यांस हवीं असलेलीं साष्टी, वसई वगैरे बेटें धरून एकूण सव्वा लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख इंग्रजांना कायमचा देण्याचें ठरविलें. व त्याच्या मोबदल्यांत त्यांनीं राघोबास पेशवेपदावर नेऊन बसविण्याचें कबूल केलें.

महादजी शिंदे हे इतके दिवस राघोबाशीं उघडपणें वैर करीत

१४४३१ २६८

नव्हते. परंतु राघोबानें स्वराज्यावर आणलेलें हें परचक्र पाहून महादजी दक्षिणेंत पेशव्यांच्या गादीच्या मदतीसाठीं आले. नाना फडणीस व महादजी शिंदे यांनीं आपल्या फौजा पुण्यास एकत्र केल्या. आणि पुण्याला येणारे सर्व रस्ते रोखून धरले. इंग्रज फौज मुंबईहून पुण्यावर चाल करण्याच्या हेतूनें निघाली. ती पनवेलच्या वाटेनें बोरघाटांतून वर घाटमाथ्यावरही आली. नानांना हें समजतांच त्यांनीं आपल्याहि फौजा इंग्रजांना तोंड देण्यासाठीं रवाना केल्या. इंग्रजांशीं झालेल्या या लढाईत कोणी कोणी कसा पराक्रम केला, हें इथें सांगण्याची जरूरी नाहीं. या लढाईत महादजींची कामगिरी कोणती तेवढेंच आपल्याला बघावयाचें आहे. इंग्रजांची फौज कार्ले येथें पोंचतांच कॅप्टन स्टुअर्ट (इस्टुर फाकडा) हा इंग्रजांचा सेनापति तेथें झालेल्या चकमकींत ठार झाला. इतक्यांत महादजींची फौज पुण्याहून निघाली आणि तिनें तळेगांवला तळ दिला. इंग्रज फौजहि खडकाळयावरून वडगांवपर्यंत येऊन पोंचली. एकीकडे इंग्रज मराठ्यांना घाबरले होते. तर दुसरीकडे ते चढाईचा आवाहि आणीत होते. राघोबानें दिलेल्या आश्वासनाप्रमाणें कांहीं मराठी सरदार ऐनवेळीं आपल्याला येऊन मिळतील अशी आशा त्यांना वाटत होती. पण शेवटीं ती फोल ठरली आणि इंग्रज पळून जाण्याचाच विचार करूं लागले. परंतु मराठे आतां त्यांना सुखासुखी परत जाऊं देईनात. त्यांनीं त्यांना लढण्यास भाग पाडलें. पण एकदां हतबल झाल्यावर ते काय लढणार ? मराठ्यांनीं दोन-तीन दिवसांतच त्यांच्यावर

एकसारखे हल्ले करून त्यांचे शेकडो लोक ठार मारले आणि त्यांना जेरीस आणलें. इंग्रजांना शरण जाण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. इंग्रजांचा फार्मर नांवाचा सेनापति मराठ्यांकडे तह करण्यासाठीं आला. या तहाच्या वेळीं महादजी हेच मराठ्यां-तर्फे बोलणे करीत होते. त्यांनीं इंग्रजांस स्पष्ट बजावलें, " लढाई करण्याबद्दल आम्हांला बाऊ दाखवूं नका. लढाईची आम्हांला मुळींच पर्वा नाहीं. परंतु तुमच्या अप्तन साहेबानें आमच्याशीं पुरंदर येथें केलेला तह मोडला. आमचे मुलखावर तुम्ही स्वारी केली आणि आमचें लाखों रुपयांचें नुकसान केलें, त्याअर्थी याच ठिकाणीं नवीन तह केल्याखेरीज तुम्हांस आम्ही परत जाऊं देणार नाहीं." तेव्हां तो इंग्रज वकील म्हणाला, "आम्हांला नवीन तह करण्याची परवानगी नाहीं." त्यावर महाद-जींनीं त्यांस विचारलें, "तुम्हांला पुरंदरचा तह मोडण्यास अधिकार आहे, हें कसें ?" यावर त्या वकिलाला कांहीं उत्तर देतां आलें नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन त्यानें महादजीशीं तह केला. या तहाप्रमाणें इंग्रजांनीं राघोबाचा पक्ष सोडला. तसेंच मराठ्यांचा साष्टी वगैरे मुलूखहि इंग्रजांनीं परत केला आणि मराठ्यांच्या राजकारणांत न पडण्याचें इंग्रजांनीं आश्वासनहि दिलें.

इंग्रजांशीं झालेल्या या पहिल्या सामन्यांत महादजी शिंदे एक मोठा धडा शिकले. वडगांवच्या लढाईच्या वेळीं त्यांना असें दिसून आलें कीं इंग्रज लोक थोडे होते खरे. त्यांचा मराठ्यांपुढें निभाव लागला नाहीं आणि ते पळून गेले हेंही स्वाभाविक होतें.

परंतु पळतांना ते मराठे सैनिकांप्रमाणें सैरावैरा पळत सुटले नाहींत. पळतांनाहि ते ठराविक पद्धतीनें पळत होते. हा कवायतीचा परिणाम आहे, हें त्यांच्या लक्षांत आलें आणि त्यांनीं इंग्रजांप्रमाणें कवायती फौजा तयार करण्याचा निश्चय केला आणि तो सिद्धीसहि नेला.

## ४ पुन्हां इंग्रज

इंग्रजांशीं झालेल्या पहिल्या लढाईनंतर पेशवाईंत कांहीं काळ स्थिरता आली. कारण राघोबा आतां शिंद्यांच्या ताब्यांत आला होता. तेव्हां महादजी व इतर मुत्सद्दी मंडळींनीं श्रीमंत सवाई माधवराव यांस पुरंदराहून मोठ्या समारंभानें पुण्याला आणलें आणि त्यांचा राज्यकारभार पुन्हां पूर्वींप्रमाणें सुरळीत सुरू झाला. एवढें झाल्यावर महादजी पुन्हां उत्तरेंत निघून गेले.

इंग्रजांचा मराठ्यांनीं पहिल्या लढाईत पराभव केला आणि महादजींच्या मार्फत त्यांनीं मराठ्यांशीं तहहि केला. परंतु त्यांना या गोष्टीची चांगलीच रुखरुख लागून राहिली होती. त्यांनीं वडगांवचा तह मोडण्याचें ठरविलें. वास्तविक महादजींनीं वडगांवला इंग्रज सैन्यास केवळ जीवदान दिलें होतें. पण त्याचें स्मरण त्यांनीं ठेविलें नाहीं. आणि कलकत्त्याहून नवीन मोठी फौज पुण्याच्या रोखानें निघाली. या वेळीं कलकत्त्याला वॉरन हेस्टिंग्ज हा गव्हर्नर जनरल होता. आणि त्याच्या मनांतून वडगांवचा अपमान धुऊन काढायचा होता.

याच वेळीं योगायोगानें आणखी एक गोष्ट घडली. शिंद्यांच्या ताब्यांत असलेला राघोबादादा त्यांच्या कैदेंतून निसटून पुन्हां इंग्रजांस जाऊन मिळाला. इंग्रजांना हें निमित्त पुरेसें होतें. या गोष्टीमुळें महादजीविषयीं बारभाईच्या मनांत कांहीं संशय निर्माण झाला. तो दूर व्हावा यासाठीं महादजींनीं राघोबादादास पुन्हा पकडून आणण्याची प्रतिज्ञा केली आणि ते जातीनें इंग्रजांना तोंड देण्यासाठीं निघाले.

इंग्रज सेनापति जनरल् गोडार्ड यानें गुजराथेंत शिरून बराचसा प्रदेश हस्तगत केला. अहमदाबादहि घेतलें. महादजींना ही गोष्ट कळल्यावर ते त्वरेनें तिकडे वळले. त्यांनीं आपली एक सहा हजार स्वारांची तुकडी मही नदीचे कांठी पाठविली आणि बाकीचें सैन्य घेऊन डभई येथें तळ दिला. तेथून इंग्रजांविरुद्ध कोणते डावपेंच करतां येतील याचा त्यांनीं नीट विचार केला आणि तो पक्का झाल्यावर त्यांनीं आपल्या हालचालींना सुरवात केली. प्रथम त्यांनीं इंग्रजांशीं सलोखा करण्याचाही आव आणला. परंतु जनरल् गोडार्डनें त्यांचें हें ढोंग ओळखलें व त्यांस दाद दिली नाहीं.

त्यानंतर महादजींनीं आपल्या फौजेच्या टोळ्या चारहि बाजूस पसरून दिल्या. प्रथम त्यांचा गनिमी काव्यानें लढण्याचाच विचार होता. परंतु गोडार्डनें तो यशस्वी होऊं दिला नाहीं. उलट गोडार्डनें शिंद्यांच्या मालकीच्या माळव्यात घुसण्याचा बेत केला. त्याबरोबर शिंद्यांनीं आपली फौज माळव्यांत नेली.

शिंद्यांचें यावेळचें वर्तन कांहींसें संशयास्पद होतें असेंच दिसतें. पेशव्यांचा कारभारी नाना फडणीस यानें महादजींना अनेक पत्रें पाठवून त्यांच्या कर्तबगारीचा आणि निष्ठेचा खूपच गौरव केलेला दिसतो. तरीपण एकूण पुणें दरबारांतील मंडळींच्या मनांत महादजींच्या या चालढकलीबद्दल संशय निर्माण झाला होता ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. तसेंच महादजींच्या मनांत सुद्धां नानाविषयीं आणि त्यांच्या पुणें दरबाराविषयीं कांहीं किंतू निर्माण झाला होता हीहि गोष्ट खोटी नव्हे. महादजींच्या सर्व कर्तृत्वाला हें एक गालबोट लागलेलें होतें ही गोष्ट विसरतां येत नाहीं. तरीपण सेनापति या दृष्टीनें महादजींकडे पाहिलें म्हणजे त्यांची सर्व कामगिरी भरघोस आणि उठावदार दिसते.

इतक्यांत पावसाळा संपला. इंग्रजांनीं कोंकणांत आणि माळव्यांत अशी दोन्ही ठिकाणीं चढाई सुरू केली. मराठ्यांचा दसरा पार पडून ते स्वारीवर निघण्याच्या आंत इंग्रजांनीं त्यांचा कांहीं मुलूख देखील घेतला. कल्याण शहर ताब्यांत घेतलें आणि वसईहि सर केली. त्यामुळें सर्व कोंकणच इंग्रजांच्या ताब्यांत गेल्यासारखें झालें. नानानें रामचंद्र गणेश, परशुरामभाऊ वगैरे सरदारांना इंग्रजांवर पाठविलें. वसईजवळ झालेल्या लढाईंत रामचंद्र गणेश हा प्रख्यात सेनानी मारला गेला. त्यामुळें इंग्रजांचें प्राबल्य वाढून त्यांचें सैन्य पुण्यावर चाल करून येण्याच्या इराद्यानें बोरघाटांतून वर निघालें. या सैन्याला परशुरामभाऊ पटवर्धन आणि हरिपंत फडके यांनीं जोराचा प्रतिकार केला आणि त्या सैन्याला मुंबईकडे पिटाळून लावलें. तिकडे खुद्द

माळव्यांत इंग्रजांच्या पोफाम साहेबानें महादजींचा बराचसा मुलूख काबीज केला. इतकेंच नव्हे, तर त्यांचा प्रसिद्ध, बळकट ग्वाल्हेरचा किल्लासुद्धां हस्तगत केला. तेव्हां महादजींना आपलें चालढकलीचें धोरण सोडावेंच लागलें आणि इंग्रजांविरुद्ध चढाई करण्याच्या योजना आंखाव्या लागल्या. कसें झाले तरी ते कसलेले सेनापति होते. इंग्रजांनीं कितीहि जोर केलेला असला तरीहि घाबरून किंवा गोंधळून न जातां, त्यांनीं शांतपणानें परंतु तितक्याच खंबीरपणानें आपल्या हालचाली सुरू केल्या. त्यांनीं सिरोंज ह्या ठिकाणीं आपला मुख्य तळ केला. इंग्रज सैन्य माळव्यांत आंतपर्यंत घुसलें होतें. महादजींच्या दृष्टीनें ही गोष्ट सोईची होती. कारण इंग्रज सैन्याला वेढून त्याची रसद तोडून टाकणें महादजींना त्यामुळेंच शक्य झालें. इंग्रज सैन्य ज्या प्रदेशांत शिरलें होतें त्या प्रदेशाच्या भोंवतालीं सर्व बाजूंनीं महादजींनीं आपलें सैन्य खडें केलें. इंग्रज सैन्य आंत कोंडलें गेलें. त्याला बाहेरून मिळणारी सर्व कुमक बंद झाली. बाहेरून आलेली सर्व रसद शिंद्यांच्या सैन्यानें लुटून फस्त केली. त्यामुळें त्याचे फार हाल होऊं लागले. त्यांतच महादजींनीं त्यांच्यावर तोफा डागल्या. सहा दिवस सतत तोफांचा भडिमार केल्यामुळें इंग्रज सैन्य जेरीस आलें. त्यांना माळव्याच्या बाहेरहि जातां येईना आणि आंत राहून शिंद्यांच्या तोफांचा प्रतिकारहि करतां येईना. बाहेरून मदत येणें तर अशक्यच झालें होतें. अशा परिस्थितींत त्यांना शिंद्यांना शरण जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतें आणि म्हणून त्यांनीं शिंद्यांशीं तहाचीं बोलणीं सुरू केलीं.

इकडे कोंकणांतहि परशुरामभाऊ वगैरे सरदारांनीं इंग्रजांना चांगलाच चोप दिला. अशा तऱ्हेनें दोन्ही ठिकाणीं फजिती झाल्यामुळें इंग्रज तहास कबूल झाले आणि त्यांनींहि महादजींशीं सालबाई येथें तह केला. या तहामुळें इंग्रजांनीं मराठ्यांचा जो जो मुलूख जिंकून घेतला होता तो तो सर्व मराठ्यांना परत केला. इंग्रजांनीं राघोबास मराठ्यांच्या ताब्यांत दिलें आणि त्याला कोणत्याहि प्रकारचें साहाय्य यापुढें देऊं नये या गोष्टीस मान्यता दिली. मात्र साष्टी व त्याच्या जवळील आणखी दोन बेटें इंग्रजांना मिळालीं. हा तह घडवून आणण्याची सर्व जिम्मेदारी महादजींनीं पत्करली होती. यावरून त्यांचे मराठ्यांच्या दरबारांत केवढें मोठें वजन होतें हें दिसून येतें.

## ५ दिल्लीवर वर्चस्व

इ. सन १७७२ त माधवराव पेशव्यांचा मृत्यु ओढवला, तेव्हांपासून दिल्लीच्या मसलती बंद पडल्या होत्या. पेशवे दरबार घरच्या भांडणांत गुंतून राहिल्यामुळें उत्तरेंत लक्ष देण्यास कोणासच अवसर मिळाला नाहीं. त्यांत इंग्रजहि प्रबळ झाले. त्यांच्याशींहि दोन वेळां मुकाबला करण्याची पाळी मराठ्यांवर आली. हें सर्व करण्यांत जवळ जवळ दहा वर्षें गेलीं. दहा वर्षांचा अवधि हा राजकारणाच्या दृष्टीनें लहान सहान काळ नव्हे. या अवधींत उत्तरेंत पुष्कळच फेरफार झाले होते. अयोध्येचा वजीर सुजाउद्दौला याचें महत्त्व बरेंच वाढलें होतें. मराठे दक्षिणेंत निघून गेल्यावर यानें मराठ्यांनीं पूर्वी जिंकलेला

माळव्यांत इंग्रजांच्या पोफाम साहेबानें महादजींचा बराचसा मुलूख काबीज केला. इतकेंच नव्हे, तर त्यांचा प्रसिद्ध, बळकट ग्वाल्हेरचा किल्लासुद्धां हस्तगत केला. तेव्हां महादजींना आपलें चालढकलीचें धोरण सोडावेंच लागलें आणि इंग्रजांविरुद्ध चढाई करण्याच्या योजना आंखाव्या लागल्या. कसें झाले तरी ते कसलेले सेनापति होते. इंग्रजांनीं कितीहि जोर केलेला असला तरीहि घाबरून किंवा गोंधळून न जातां, त्यांनीं शांतपणानें परंतु तितक्याच खंबीरपणानें आपल्या हालचाली सुरू केल्या. त्यांनीं सिरोंज ह्या ठिकाणीं आपला मुख्य तळ केला. इंग्रज सैन्य माळव्यांत आंतपर्यंत घुसलें होतें. महादजींच्या दृष्टीनें ही गोष्ट सोईची होती. कारण इंग्रज सैन्याला वेढून त्याची रसद तोडून टाकणें महादजींना त्यामुळेंच शक्य झालें. इंग्रज सैन्य ज्या प्रदेशांत शिरलें होतें त्या प्रदेशाच्या भोंवतालीं सर्व बाजूंनीं महादजींनीं आपलें सैन्य खडें केलें. इंग्रज सैन्य आंत कोंडलें गेलें. त्याला बाहेरून मिळणारी सर्व कुमक बंद झाली. बाहेरून आलेली सर्व रसद शिंद्यांच्या सैन्यानें लुटून फस्त केली. त्यामुळें त्याचे फार हाल होऊं लागले. त्यांतच महादजींनीं त्यांच्यावर तोफा डागल्या. सहा दिवस सतत तोफांचा भडिमार केल्यामुळें इंग्रज सैन्य जेरीस आलें. त्यांना माळव्याच्या बाहेरहि जातां येईना आणि आंत राहून शिंद्यांच्या तोफांचा प्रतिकारहि करतां येईना. बाहेरून मदत येणें तर अशक्यच झालें होतें. अशा परिस्थितींत त्यांना शिंद्यांना शरण जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतें आणि म्हणून त्यांनीं शिंद्यांशीं तहाचीं बोलणीं सुरू केलीं.

इकडे कोंकणांतहि परशुरामभाऊ वगैरे सरदारांनीं इंग्रजांना चांगलाच चोप दिला. अशा तऱ्हेनें दोन्ही ठिकाणीं फजिती झाल्यामुळें इंग्रज तहास कबूल झाले आणि त्यांनींहि महादजींशीं सालबाई येथें तह केला. या तहामुळें इंग्रजांनीं मराठ्यांचा जो जो मुलूख जिंकून घेतला होता तो तो सर्व मराठ्यांना परत केला. इंग्रजांनीं राघोबास मराठ्यांच्या ताब्यांत दिलें आणि त्याला कोणत्याहि प्रकारचें साहाय्य यापुढें देऊं नये या गोष्टीस मान्यता दिली. मात्र साष्टी व त्याच्या जवळील आणखी दोन बेटें इंग्रजांना मिळालीं. हा तह घडवून आणण्याची सर्व जिम्मेदारी महादजींनीं पत्करली होती. यावरून त्यांचे मराठ्यांच्या दरबारांत केवढें मोठें वजन होतें हें दिसून येतें.

## ५ दिल्लीवर वर्चस्व

इ. सन १७७२ त माधवराव पेशव्यांचा मृत्यु ओढवला, तेव्हांपासून दिल्लीच्या मसलती बंद पडल्या होत्या. पेशवे दरबार घरच्या भांडणांत गुंतून राहिल्यामुळें उत्तरेंत लक्ष देण्यास कोणासच अवसर मिळाला नाहीं. त्यांत इंग्रजहि प्रबळ झाले. त्यांच्याशींहि दोन वेळां मुकाबला करण्याची पाळी मराठ्यांवर आली. हें सर्व करण्यांत जवळ जवळ दहा वर्षें गेलीं. दहा वर्षांचा अवधि हा राजकारणाच्या दृष्टीनें लहान सहान काळ नव्हे. या अवधींत उत्तरेंत पुष्कळच फेरफार झाले होते. अयोध्येचा वजीर सुजाउद्दौला याचें महत्त्व बरेंच वाढलें होतें. मराठे दक्षिणेंत निघून गेल्यावर यानें मराठ्यांनीं पूर्वी जिंकलेला

दुआबामधला प्रदेश पुन्हां काबीज केला होता. परंतु इ. सन १७७५ त सुजाउद्दौला मरण पावला व त्याचा मुलगा असफउद्दौला नबाब झाला. तो सदैव रंगविलासांत मग्न असे. त्यामुळें त्याचें दिल्लींतील कारभाराकडे पूर्णपणें दुर्लक्ष झालें.

पानिपतनंतर प्रसिद्धीला आलेला दुसरा प्रसिद्ध सरदार म्हणजे नजफखान. हा बादशहा शहाआलमचा वजीर होता. तो मराठ्यांचा अत्यंत द्वेष्टा होता. त्यानें सुमरू नांवाचा जर्मन आणि मेडॉक नांवाचा फ्रेंच, या दोन युरोपियन सेनापतींच्या मदतीनें कवायती पलटणी तयार केल्या. नजफखान १७८२ मध्यें मरण पावला. दिल्ली दरबारांतला हा शेवटचा मुसलमान मुत्सद्दी. तो जिवंत असेपर्यंत बादशाहीची अब्रू कांहीं तरी राहिली. परंतु हाहि आधार कोसळतांच बादशाहीचा जुनाट इमला तावडतोब खालीं कोसळला. नजफखानाचें वजन आणि शहाणपण मराठे मुत्सद्दी चांगलें ओळखून होते. तो असेपर्यंत मराठ्यांना दिल्लीच्या कारभारांत प्रत्यक्ष लुडबूड करतां आली नाहीं. परंतु तो मेल्यावर वजिरीसाठींच भांडणें सुरू झालीं आणि मग मराठ्यांना दिल्लीच्या कारभारांत पडण्याची संधि अनायासें मिळाली. या वेळीं उत्तरेंतील सर्व राजकारणाचे सूत्रधार महादजीच असल्यामुळें या पुढील दिल्लींतील सर्व राजकारण त्यांनींच चालविलें. स्वत: शहाआलम बादशहा हा कर्तृत्वशून्य आणि अजागळ होता. कुणीहि हें बाहुलें हातीं धरावें आणि राज्यकारभार करावा अशी त्यावेळची परिस्थिति होती. त्यामुळेंच इतर सर्वांत लष्करी दृष्ट्या बलवान ठरलेल्या महादजींना दिल्लींत आपलें वर्चस्व प्रस्थापित करणें सहज शक्य झालें.

इंग्रजांचेंहि दिल्लीवर लक्ष होतेंच. परंतु महादजी उत्तरेंत असे-पावेतों इंग्रजांच्या खटपटींना यश येण्यासारखें नव्हतें. त्यांनीं सूज्ञपणानेंच दिल्लीच्या राजकारणापासून अलिप्त राहण्याचें ठरविलें. शहाआलम बादशहाचा मुलगा शहाजादा जवानबख्त हा दिल्लीतून गुप्तरीतीनें पळून इंग्रजांकडे गेला होता आणि त्यानें त्यांची मदतहि मागितली होती. परंतु वॉरन हेस्टिंजनें त्यास मदत देण्याचें नाकारलें.

अशा परिस्थितींत दिल्लींत आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरतां महादजी हे एकटेच कर्तबगार आणि लायक सरदार उरले. त्यांनीं दिल्ली दरबारची एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन आणि पूर्ण विचार करून आपलें पुढील धोरण निश्चित केलें. त्यांत तीन गोष्टी प्रमुख होत्या. ( १ ) निर्बुद्ध आणि दुबळ्या बादशहाच्या विश्वासावर कोणतीहि मसलत अंगावर घ्यायची नाहीं. त्याच्याशीं शक्य तितकें गोडीनें वागून आपला फायदा करून घ्यायचा. ( २ ) वजिराच्या पदासाठीं दिल्लींत अनेक लोकांचीं भांडणें जुंपलीं होतीं. या भांडणांत न पडतां तटस्थपणानें वागून सर्वांचा भलेपणा मिळवावयाचा. ( ३ ) दिल्लीच्या आजूबाजूला असलेले महत्त्वाचे किल्ले आणि ठाणीं हळुहळू काबीज करून दिल्ली प्रांत आपल्या ताब्यांत आणावयाचा. हें सर्व करीत असतांना दिल्लीच्या पातशहाला आपल्या ताब्यांत घ्यावयाचें, पण दिल्लीच्या तख्ताला मात्र शिवावयाचें नाहीं, हेंच धोरण महादजींनीं ठेवलें होतें.

इ. सन १७८४ च्या नोव्हेंबर महिन्यांत बादशहानें महादजींच्या भेटीची इच्छा दर्शविली. त्याप्रमाणें फत्तेपूर येथें त्या

दोघांची भेट मोठ्या सन्मानानं घडून आली. महादजींनीं बादशहापाशीं येऊन त्यांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांना एकशें एक मोहोरा नजर केल्या. बादशहानेंसुद्धां पाटीलबाबांचे पाठीवर ममतेनें हात फिरवला आणि त्यांना आपल्या जवळ बसवून घेतलें. बादशहानें पाटीलबाबांना शिरपेंच, मोत्यांचा कंठा वगैरे देऊन त्यांचा मोठा सन्मान केला. पाटीलबाबांनीं तेथें दोन घटका बसून खलबतें केलीं. शेवटीं पातशहानें आपल्या वजिरीचा अधिकार त्यांस देऊं केला. पण महादजी मोठे धोरणी होते. त्यांनीं बादशहास विनंति केली कीं, 'आपणांस जो कांहीं मानसन्मान किंवा अधिकार द्यावयाचे असतील, ते सर्व माझे धनी सवाई माधवराव पेशवे यांस द्यावेत. मी त्यांचा मुतालिक या नात्यानें आपली चाकरी करीन." आणि खरोखरीच महादजींना बहुमानाच्या पोकळ पदव्यांपेक्षां त्यांचें गांवठी नांव 'पाटीलबाबा' हेंच फार आवडत असे. शेवटीं या भेटींत बादशहानें पेशव्यांस 'वकील–इ–मुत्लक' म्हणजे 'बादशहाचा प्रतिनिधि' असा किताब दिला आणि शिंद्यांस 'मीरबक्षी' असा हुद्दा देऊन सर्व बादशाही फौज त्यांच्या ताब्यांत दिली. याशिवाय बादशहानें दिल्ली व आग्रा हे दोन प्रांत शिंद्यांच्या ताब्यांत दिले. शिंद्यांनीं ते दोन्ही प्रांत मराठी साम्राज्यास जोडले. या दोन प्रांतांच्या उत्पन्नांतून शिंद्यांनीं बादशाही फौजेचा खर्च भागवावा असे ठरलें. उलट शिंद्यांनीं बादशहास दरमहा ६५ हजार रुपये खाजगी खर्चासाठीं द्यावे आणि पुढें राज्याचें उत्पन्न जसजसें वाढेल, तसतशी ही रक्कम वाढवावी, असा त्यांच्यामध्यें करार झाला. अर्थातच सर्व

राज्याचे रक्षण करण्याची आणि वसूल गोळा करण्याची जबाबदारी शिंद्यांना पत्करावी लागली हें उघडच आहे. दिनांक १ मे १७८५ रोजीं बादशहानें मोठा दरबार भरविला आणि पाटीलबावांना नायबतीच्या मुखत्यारीचीं वस्त्रें अर्पण करण्याचा जंगी



बादशहाकडून बहुमान

आणि थाटाचा समारंभ घडवून आणला. या समारंभानंतर पाटीलबावांनीं आपल्या नांवाचा जो शिक्का करविला, त्यांतील हा मजकूर पहा.

—'वकील मुतलखुमद दुल् उमराव मुतगरूल् मुमालिक फर्जन्द अलीजहाँ महाराजाधिराज माधवराव शिंदे श्रीनाथ बहादुर

मनसुरजमा फिदवी शहाआलम पातशहा गाजी' दुसरा एक छोटा शिक्का होता. त्यांत, 'वकील मुत्लक अलीजहाँ श्रीनाथ महाराज माधवराव शिंदे बहादुर' एवढाच मजकूर होता. शिंद्यांनीं याप्रमाणें आपल्या नांवचे शिक्के करून कारभार सुरू केला, या गोष्टीचा पेशव्यांना राग आला. तेव्हां पुढें शिंद्यांनीं पेशव्यांच्या नांवचे नवीन शिक्के करविले.

वरील दरबाराच्या वेळीं पाटीलबाबांनीं एक अतिशय महत्त्वाची गोष्ट घडवून आणली. त्यांनीं राज्यांत गोवध बंद करण्याचा हुकूम शहाआलम बादशहाकडून मिळविला.

अशा रीतीनें सर्व कारभार हातीं येतांच पाटीलबाबांनीं बादशहाचा दरारा वाढविण्याचे आणि सर्वत्र आपला अंमल बसविण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांनीं दरबारांतील लुच्चे व स्वार्थी लोक दूर केले व त्यांच्या जागीं चांगलीं माणसें नेमलीं. रजपूत वगैरे लोकांपासून पूर्वापार जे वसूल यावयाचे राहिले होते तेहि त्यांनीं गोळा केले. मात्र यामुळें सर्व रजपुतांचें शत्रुत्वाहि त्यांनीं ओढवून घेतलें.

पाटीलबाबांना मथुरा हें तीर्थस्थळ अतिशय प्रिय होतें. त्यांनीं दिल्लीला अंमल बसतांच आपला मुख्य तळ मथुरा येथेंच ठेवला होता. प्रत्यक्ष दिल्लीच्या किल्ल्याच्या बंदोबस्ताचें काम त्यांनीं आपला जांवई नरसिंगराव देशमुख याच्याकडे सोंपविलें. थोड्याच दिवसांत आग्र्याचा किल्ला आणि अलिगड हें शहर शिंद्यांच्या ताब्यांत आलें.

महादजींनीं बादशहाच्या उत्तरेंतील सर्व प्रदेशावर आपला

भक्कम अंमल बसविला. राजपुतान्यांतील रजपूत राजे, जाट, रोहिले व पठाण सरदार यांपैकीं कोणीहि बादशहाला पूर्वापार ठरलेली खंडणी देत नव्हते. या सर्वांनीं बादशहाचा अंमल पार झुगारून दिला होता. अशा या बंडखोरांचा नायनाट करण्याची जबाबदारी शिंद्यांवर आली आणि त्यांनीं हें काम बरेंचसें तडीस नेलें. अंतर्वेदी व दुआब या प्रदेशांवर स्वाऱ्या करून त्यांनीं रोहिल्यांचा व पठाणांचा पूर्णपणें मोड केला. हें केल्यावर त्यांनीं आपलें सर्व लक्ष रजपुतांकडे वळविलें. रजपूत राजांकडे खंडणीची बरीच बाकी राहिली होती. महादजींनीं ती चुकती करण्याबद्दल त्यांच्याकडे तगादा लावला होता. परंतु रजपूत राजे दाद देईनात. तेव्हां महादजींनीं त्यांच्या मुलखावर स्वाऱ्या करून बरीचशी वसुली केली. तरी पण जयपूर, जोधपूर यांच्यासारख्या मोठमोठ्या राजांनीं-सुद्धां खंडणीच्या बाबतींत आडमुठेपणाचें धोरण स्वीकारलें. तेव्हां महादजींनीं रजपुतांविरुद्ध युद्ध करण्याची मोठ्या प्रमाणावर तयारी केली. आपलें व बादशहाचें असें सर्व सैन्य एकत्र केलें आणि आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें शत्रूची सर्व बाजूंनीं नाकेबंदी करण्याचें त्यांनीं ठरविलें. रजपुतांच्या मनांतहि शिंद्यांच्या कारभारा-बद्दल असंतोषाचा अग्नि धुमसत होता. त्यांनींसुद्धां एकत्र येऊन महादजींच्या सैन्याला निकरानें तोंड देण्याचें ठरविलें. दोन्ही सैन्यें जयपूरजवळ लालसोट येथें जमा झालीं. ही लालसोटची लढाई इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. ही लढाई इ. स. १७८७ मध्यें झाली. शिंद्यांच्या ताब्यांत या वेळीं १० हजार घोडेस्वार,

सव्वाशें तोफा आणि भरपूर दारूगोळा होता. शिवाय त्यांनीं नवीनच तयार केलेल्या पांच—सहा कवायती पलटणीसुद्धां होत्या. या कवायती पलटणींचा या लढाईत फार चांगला उपयोग झाला. जनरल डिबॉईन हा या कवायती फौजेचा मुख्य सेनापति. तो फ्रेंच होता. त्याच्यावरच शिंद्यांची सर्व भिस्त होती. या फौजेनें आणि शिंद्यांच्या अद्ययावत् तोफखान्यानें रजपूत सैन्याला बेजार केलें. रजपुतांना महंमद बेग हमदानी हा बादशाही सरदार सामील झाला होता. तो एक मोठा कसलेला योद्धा होता. त्याच्यावरच रजपुतांची सारी भिस्त होती. परंतु लढाईला तोंड लागतांच तोफेचा गोळा लागून हमदानी ठार झाला. त्यामुळें रजपुतांचा मोड होऊन ते मागें हटले. मराठ्यांनीं ह्या लढाईत मोठा पराक्रम गाजवून विजय मिळविला. परंतु त्या विजयाचा प्रत्यक्ष फायदा मात्र त्यांना मिळाला नाहीं. कारण मराठ्यांच्या सैन्यांत सामील झालेलें बादशाही सैन्य मुळांतच शिंद्यांवर नाराज होतें. लालसोटच्या विजयामुळें शिंद्यांचें प्राबल्य वाढेल असें दिसतांच मोंगल सैन्य शिंद्यांविरुद्ध एकाएकीं बंड करून उठलें. आणि मोठा आणीबाणीचा प्रसंग निर्माण झाला. शिंद्यांनीं चांगला बंदोबस्त केला होता म्हणून बरें. नाहींतर मराठ्यांचें पुन्हां पानिपत होण्याचा प्रसंग आला होता. शेवटीं रजपूत आणि मोंगल सैन्यें एकत्र झालेलीं पाहून महादजींना माघार घेणें भाग पडलें. त्यांनीं आपलें सैन्य भरतपूरच्या किल्ल्यावर सुरक्षित ठिकाणीं नेलें.

लालसोटच्या ह्या विचित्र लढाईचा परिणाम फार निराळा

झाला. बादशाही सैन्यांत फितुरी फार झाली असल्यामुळें त्यांवर भरंवसा ठेवणें शिंद्यांना धोक्याचें वाटूं लागलें. ते असें स्पष्ट म्हणूं लागले कीं, " हिंदुस्तानवासियांच्या विश्वासावर गेलों त्याचें फळ पावलों." लालसोटच्या पिछेहाटीच्या बातम्या दिल्लींत येऊन थडकल्या आणि त्याबरोबर दिल्लींतील गुंड लोक मराठ्यांच्या जिवावर उठले. पानिपतावर मराठ्यांचा नाश घडवून आणणारा दुष्ट नजीबखान रोहिला मरण पावला होता. परंतु त्याचा नातू गुलाम कादर यानें या वेळीं आपलें डोकें वर काढलें होतें. गुलाम कादर हा मराठ्यांचा कट्टा द्वेष्टा होता. शिंदे घराण्याशीं तर त्याचें हाडवैर होतें. तो अत्यंत क्रूर, दुष्ट आणि राक्षसीवृत्तीचा होता. दिल्ली दरबारांत आपणहि वरचढ व्हावें असें त्यास वाटत होतें. परंतु ही गोष्ट शिंद्यांमुळें शक्य झाली नव्हती. त्यामुळें तो शिंद्यांविरुद्ध अतिशय जळफळत असे. लालसोटच्या लढाईच्या वेळीं गोंधळ माजून शेवटीं शिंद्यांना जो पळ काढावा लागला त्याचा खरा आनंद गुलाम कादरला झाला. त्याला ही एक नामी संधि मिळाली. शिंदे दिल्लीपासून लांब आहेत हें पाहून गुलाम कादरनें एकाएकीं दिल्लीवर स्वारी केली. तो दिल्लींत आला हें पाहून बादशहाच्या रक्षणासाठीं नेमलेले कारभारी दिल्ली सोडून पळून गेले. तेव्हां गुलाम कादरनें एकदम राजवाड्यावरच हल्ला चढविला व बादशहाकडून बळजबरीनें सरसेनापतीचीं वस्त्रें मिळविलीं. नंतर गुलाम कादरनें दिल्ली शहरांत भयंकर अत्याचार केले. त्यानें पैशासाठीं बादशहालासुद्धां भयंकर छळलें. बादशहापाशीं खरोखरीच

पैसे नव्हते. परंतु त्या पिसाळलेल्या कुत्र्याला तें खरें वाटलें नाहीं. आणि त्यानें बादशहाला तख्तावरून खालीं ओढून त्यास लाथेनें मारण्यासहि कमी केलें नाहीं. नंतर त्यानें बादशहाला कैदेंत डांबून टाकलें. आणि राजवाड्यांतील दास-दासींसुद्धां सर्वांना बेदम मारून जेवढी लूट मिळवतां आली तेवढी मिळवली. एके दिवशीं तर बादशहाला चाबकानें मारलें. इतकेंच नव्हे तर त्याचे दोन्ही डोळे फोडून टाकले. त्याच्या या दुष्ट कृत्यांच्या बातम्या महादजींना समजल्या. तेव्हां त्यांनीं आपलें सैन्य गुलाम कादरचें पारिपत्य करण्यासाठीं पाठविलें. डिबॉइनच्या फौजेनें गुलाम कादरला पकडून कैद केलें आणि मथुरेला शिंद्यांकडे आणलें. गुलाम कादरची ती क्रूर आकृति पाहतांच शिंद्यांच्या डोळ्यांपुढें बादशहाचे त्यानें केलेले हाल दिसूं लागले. ते भयंकर संतापले. त्यांनीं बादशहाच्या अपमानाचा सूड पुरेपूर घेण्याचें ठरविलें. गुलाम कादरची त्यांनीं गाढवावरून धिंड काढली. नंतर त्याचे हातपाय तोडून टाकले, डोळे फोडले. आणि हाल हाल करून त्याला ठार मारलें. गुलाम कादरसारखा क्रूरतेचा मूर्तिमंत पुतळा छिन्नविच्छिन्न झाला. ही वार्ता बादशहाला कळतांच त्याला अतिशय आनंद झाला. शिंद्यां-विषयींच्या कौतुकानें, आदरानें त्याचें मन भरून आलें. शिंद्यांच्या इमानीचें कौतुक आणखी एक पदवी शिंद्यांना देऊन त्यानें केलें. ती पदवी म्हणजे 'अलिजाबहादूर'.

गुलाम कादराचा बीमोड झाल्यामुळें पाटीलबाबांचें गमावलेलें वजन पुन्हां प्रस्थापित झालें. त्यांनीं सर्व बंडखोरांचें पारिपत्य करून पुन्हां एकदां बादशाही अंमल स्थिर केला. ही

## ६ शिंद्यांचें बळ कवायती पलटणींत

सर्व करामत त्यांच्या कवायती सैन्यानें घडवून आणली. महादजींचें वैशिष्ट तें हेंच. बादशाही सैन्य तर बाजारबुणग्यांचें होतेंच. पण मराठी सैन्यांतहि पेंढाऱ्यांची संख्या कांहीं कमी नसे. हे बाजारबुणगे पेंढारी शिपाई लढाईच्याकामीं कुचकामी ठरतात, हें महादजींच्या ध्यानांत आलें. त्यांच्यावर विसंबून न राहतां इंग्रज फ्रेंचांप्रमाणें कवायती फौज उभी करण्यावरच त्यांनीं भर दिला. अद्यावत् तोफखाना सजविला. दारुगोळ्याचे कारखाने काढले. नवीन युद्धपद्धति समजावून घेतल्या. आणि अशा रीतीनें त्यांनीं आपल्या फौजेंत आमूलाग्र सुधारणा केली. मराठे सरदारांत काय किंवा त्यांच्या सैनिकांत काय, अलीकडच्या काळांत एक फार मोठा दोष निर्माण झाला होता. तो म्हणजे, वरिष्ठांची आज्ञा डावलणें. मराठ्यांच्या एकूण राज्यकारभारांतहि शिस्तीचाच मोठा अभाव होता. त्यामुळेंच उत्तर पेशवाईत एवढी बजबजपुरी माजली. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन त्यावर एकमेव तोडगा म्हणून, नवीन कवायती पलटणी तयार करण्याचें महादजींनीं ठरविलें तें योग्यच होतें.

मराठे गनिमी पद्धतीनें लढत असत. या पद्धतींत सर्व हाल-

चाली अतिशय चपळाईनें कराव्या लागत. शत्रूला घेरून त्याच्यावर छापे घालणें, त्याला हुलकावण्या देत देत त्याच्या ठाण्यांपासून लांब नेणें आणि संधि साधून त्यावर उलट हल्ला चढविणें यालाच गनिमी कावा म्हणत. पांच-पन्नास मैलांच्या टापूंत जाळपोळ आणि लुटालूट करून शत्रूला गोंधळवून टाकणें हेंच या पद्धतीचें वैशिष्ट्य असे. मराठ्यांची सारी फौज घोडेस्वारांची असे. त्यामुळें त्यांना आपल्या सर्व लष्करी हालचाली चपळाईनें करतां येत.

परंतु आतां सर्व परिस्थिति पालटली होती. मराठ्यांचें वर्चस्व देशाच्या बऱ्याच मोठ्या भागांत प्रस्थापित झालें होतें हें खरें. तरीपण इंग्रजांसारखे प्रबळ परकीय शत्रूहि चांगलेच पुढें सरसावले होते. इंग्रज-फ्रेंचांची सारी भिस्त त्यांच्या कवायती फौजेवर असे. यापुढील काळांत इंग्रजांशींच मुकाबला करण्याचे प्रसंग अधिक येणार होते. कवायती फौजेला तोंड देणें मराठ्यांना जड जात असे. कारण कवायती सैन्याचें बळ हें सैन्याच्या संख्येंत नसून तें त्याच्या शिस्तीत होतें. महादजींनीं मोठ्या दूरदृष्टीनें ही गरज ओळखली आणि या नव्या युद्ध पद्धतीचा अंगीकार केला.

सालबाईच्या तहानंतर शिंद्यांनीं डिबॉईन नांवाच्या फ्रेंच सेनापतीच्या हाताखालीं सुरवातीला तीन कवायती पलटणी तयार केल्या. हा डिबॉईन पूर्वीं बरेच दिवस इंग्रजांच्या नोकरींत होता. हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं त्यानें युरोपांत अनेक लढायांत भाग घेतला होता. नवीन युद्धविद्या त्यानें आत्मसात् केली होती. तो आपलें नशीब काढण्यासाठीं हिंदुस्थानांत आला आणि इंग्रजांच्या

नोकरींत राहिला. पुढें महादजींनीं त्याची योग्यता ओळखली आणि त्याला आपल्या नोकरींत घेतलें. त्याला शिंद्यांनीं अंतर्वेदींत एक बरीच मोठी जहागीरहि दिली होती. त्यानें आपल्या जहागिरीची व्यवस्थाहि इतकी उत्तम ठेवली होती कीं, शिंद्यांना ती पाहून त्याचें मोठें कौतुक वाटलें. त्याच्या कर्तृत्वाचा शिंद्यांवर बराच मोठा प्रभाव पडला होता.

हळूहळू शिंद्यांनीं पातशाही दौलतीच्या आधारावर चार ब्रिगेडस् तयार केलीं. एका ब्रिगेडमध्यें आठ पलटणी असत. आणि प्रत्येक पलटणींत आठशें शिपाई असत. तसेंच प्रत्येक ब्रिगेडमध्यें पांचशें घोडेस्वार आणि पांच उत्तम प्रतीच्या तोफा असत. मुसा पेरॉन या नांवाचा दुसरा एक युरोपियन अंमलदार शिंद्यांच्या नोकरींत होता. त्यानेंहि एक ब्रिगेड तयार केलें होतें. शिंद्यांच्या फौजेंत एका विशिष्ट प्रकारच्या कवायती शिकवून तयार केलेले १५००० घोडेस्वार असत. त्यांच्या बंदुकांच्या तोंडाशीं बागनेटे जोडलेलीं असत. हातघाईच्या लढाईंत या बागनेटांचा भाल्या-सारखा उपयोग होई. पुढें शिंद्यांनीं आपल्या पायदळाच्या बंदुकांनाहि बागनेटे जोडलीं. ही बंदुकांना बागनेटें जोडण्याची कल्पना आतांपर्यंत कोणाहि सेनापतीला सुचली नव्हती. शिंद्यांना ती प्रथम सुचली आणि त्यांनीं ती प्रथम अंमलांत आणली. या शिवाय शिंद्यांकडे सँक्स्टर नांवाचा एक इंग्रज अधिकारी होता. त्याच्या मदतीनें शिंद्यांनीं आग्रा येथें तोफा व दारुगोळा तयार करण्याचा मोठा कारखाना काढला. या कारखान्यांत उत्कृष्ट

दर्जाचीं युरोपियनघर्तीचीं हत्यारें, तोफा, बंदुका, काडतुसें आणि तोफांचे गोळे अशा सर्व प्रकारचें युद्धसाहित्य तयार होत असे. शिंद्यांचा तोफखानाहि प्रचंड होता. या सर्व सरंजामाच्या जोरावरच शिंदे अवघ्या पांच-सात वर्षांच्या अवधींतच लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानांत सर्वश्रेष्ठ सत्ताधीश ठरले होते.

### ७ अखेर —

शिंद्यांचा उत्कर्ष शिगेला जाऊन पोहोंचला होता. बादशहा केवळ नांवाला गादीवर होता. शिंद्यांनीं दिलेल्या पोटगीवर त्याला आपला निर्वाह चालवावा लागत होता. त्याची सर्व दौलत आणि मुलूख शिंद्यांच्या ताब्यांत होता. एवढी मोठी पातशाही मराठ्यांच्या एका सरदारानें दक्षिणेंतून येऊन ताब्यांत घ्यावी ही गोष्ट रजपुतांना रुचत नसे. ते त्यांचा मनांतून द्वेष करीत. मेवाड, जयपूर, जोधपूर, उदयपूर येथील सर्व राजे बादशहाचे मांडलिक होते. ते बादशहाला ठराविक खंडणी देण्यास बांधलेले होते. शिंद्यांच्या हातांत बादशाही कारभार आल्यापासून शिंदे त्यांना एक छदामसुद्धां माफ करण्यास तयार नव्हते. बादशहाच्या भोंगळ कारभाराची संवय झालेल्या रजपुतांना शिंद्यांची करडी शिस्त खुपूं लागली यांत नवल नाहीं. त्यामुळेंच ते शिंद्यांवर नाराज होत.

शिंद्यांचा उत्कर्ष सहन न होणारा एकमेव मुसलमान सरदार म्हणजे इस्माईल बेग. हा मोठा कारस्थानी पुरुष होता. त्यानें शिंद्यांविरुद्ध अनेक कारस्थानें केलीं. गुलाम कादरच्या बंडांत तोहि

सामील होता आणि रजपुतांना शिंद्यांविरुद्ध उठविण्यांत त्याचाच नेहमीं हात असे. शिंद्यांच्या नाशासाठीं तो टपलेलाच होता. पूर्वीं रजपूत राजांनीं नागोरच्या वेढ्याच्या वेळीं महादजी शिंद्यांचे थोरले बंधु जयाजीराव यांच्यावर मारेकरी घालून त्यांचा खून केला होता. बेगच्या सल्ल्यानें याहि वेळीं त्यांनीं महादजींवर तोच दुष्ट प्रयोग केला. त्यांनीं चार मारेकरी शिंद्यांवर पाठविले. त्यांत मोटामल्ल नांवाचा एक माणूस मराठ्यांच्या ओळखीचा निघाला. त्यामुळें हा कट उघडकीस आला आणि रजपुतांचा डाव हुकला. आपला डाव हुकला हें पाहून रजपुतांनीं इस्माईल बेगच्या सांगण्यानुसार शिंद्यांविरुद्ध युद्धाची तयारी चालविली. पुन्हां एकदां सर्व रजपूत राजे एकत्र आले. इस्माईल बेगहि आपल्या सैन्यासह त्यांच्या मदतीस आला आणि ही सर्व फौज जयपूर प्रांतांत पाटण याठिकाणीं तळ देऊन राहिली. शिंद्यांनींसुद्धां लढाईची जोरदार तयारी केली. त्यांचे जिवबादादा बक्षी, अंबाजी इंगळे, डिबॉईन हे प्रसिद्ध सेनापति हजर होते. शिवाय पेशव्यांचे सैन्यहि त्यांच्या मदतीला आलें होतें. रजपूत आणि मोंगल सैन्य संख्येनें मराठ्यांपेक्षां जास्त होतें. यावेळचा रजपुतांचा उत्साहसुद्धां खूप वाढलेला होता. कारण लालसोटच्या लढाईच्या वेळीं शिंद्यांची जशी फजिती केली, तशी या वेळीं सुद्धां आपण करूं शकूं असें त्यांना वाटत होतें.

२० जून १७९० यादिवशीं लढाईला तोंड लागलें. हा सर्व प्रदेश डोंगराळ होता. सर्व रजपूत फौज डोंगराच्या आश्रयालाच

तळ देऊन राहिलें होतीं. शिंद्यांनीं आपली फौज नेहमींप्रमाणें चारहि बाजूंना विभागली. त्यांनीं आपला तोफखाना रजपूत सैन्याच्या तोंडावर ठेवला. बाकीच्या तीन बाजूंच्या फौजांनीं रजपूत सैन्यावर हल्ला करून त्यांना बाहेर मैदानांत ओढलें. त्याबरोबर शिंद्यांच्या तोफखान्यानें त्यावर जोरदार मारा केला. त्याला तोंड देणें रजपूत सैन्याला अशक्य होऊन तें पळून गेलें. इस्माईल बेग व रजपुतांचें इतर सेनापतीसुद्धां कसेबसे जीव बचावून पळाले.

या लढाईंत शिंद्यांनीं तोफा, हत्ती वगैरे बरीच लूट मिळवली. त्यांच्या कवायती फौजेनें या वेळीं सुद्धां मोठीच कामगिरी बजावली. या कवायती फौजेची रजपुतांवर बरीच जरब बसली.

पाटणच्या या लढाईंत रजपुतांचा पराभव झाला, तरी त्यांनीं धीर सोडला नाहीं. त्यांनीं नव्या अवसानानें पुन्हां युद्धाची तयारी केली आणि आतां ही निर्वाणीची लढाई असें समजून सर्व रजपूत पुरुषांनीं केशरी पोशाख चढवून मरणाच्या तयारीनें रणांगणांत प्रवेश केला. परंतु मेडता या ठिकाणीं झालेल्या लढाईंत हे सर्व रजपूत शिंद्यांच्या तोफांच्या भडिमाराला बळी पडले. अशा रजपुतांची संख्या चार हजारांवर होती. या लढाईनंतर शिंद्यांनीं मेडता, सांबर व अजमीर हीं रजपुतांची महत्त्वाचीं ठाणीं काबीज केली. त्याबरोबर रजपूत शरण आले आणि त्यांनीं शिंद्यांशीं पुष्कर या ठिकाणीं तह केला. अशारीतीनें रजपुतांचा पूर्ण पाडाव होऊन शिंद्यांची बाजू चांगलीच बळकट झाली.

तरीपण अद्याप इस्माईल बेग हा कारस्थानी पुरुष हयात होता. शिंद्यांनीं त्याचा चार वेळां पराभव केला. तरीहि त्यानें धीर सोडला नाहीं, पुन्हां त्यानें नवीन तयारी करून गुजराथमधील मराठ्यांच्या प्रदेशांत धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. शिंद्यांना हें समजतांच त्यांचें सैन्य बेगवर चालून गेलें. तेव्हां बेग राजपुतान्यांत पळाला. तेथें रजपूत राजांनीं त्याला कोणत्याहि प्रकारची मदत केली नाहीं. शेवटीं तो कन्नोद येथील किल्ल्यावर जाऊन राहिला. शिंद्यांची फौज त्याच्या पाठलागावर होतीच. मराठी फौजेनें केवळ चार घटकांच्या अवधींत बेगची फौज उधळून लावली आणि कन्नोदचा किल्ला सर केला. बेगचा हा किल्ला म्हणजे शेवटचा आधार होता. तोहि तुटल्यामुळें बेग अगदींच निराधार झाला. तो डिबॉईनला शरण गेला आणि त्याच्याकडून त्यानें अभयवचन घेतलें. शिंद्यांच्या मनांतून बेगला ठार मारावयाचें होतें. परंतु डिबॉईननेंच त्याला अभय दिलेलें असल्यामुळें शिंद्याचें कांहीं चाललें नाहीं. बेगला आग्र्याच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवण्यांत आलें. तेथेंच तो १७९९ त मरण पावला. अशारीतीनें मराठ्यांचा आणि बादशहाचा हा शेवटचा शत्रू जगाच्या पाठीवरून नाहींसा झाला.

शिंद्यांनीं केलेली ही शेवटची लढाई. आतां उत्तरेंत शिंदे हे एकमेव प्रबळ सत्ताधीश राहिले. मराठ्यांच्या इतिहासांत एवढें महत्त्वाचें आणि गौरवाचें स्थान दुसऱ्या कोणालाहि लाभलें नाहीं. शिंद्यांच्या अंगीं असलेले अनेक गुणच याला कारणीभूत आहेत.

दृढ स्वामीनिष्ठा, प्रखर राष्ट्राभिमान, राजकारणाची दूरदृष्टि, करारीबाणा, शौर्य, धाडस आणि पराक्रम यांसारखे कितीतरी गुण महादजींच्या ठिकाणीं वास करीत होते.

अशा ह्या अत्यंत प्रबळ सरदाराचें पुणें दरबाराशीं तितकेसें सख्य नव्हतें. दिल्लींतील सत्ता आपल्या हातांत आली, आतां पेशव्यांचा कारभारी आपल्या हातांत आला पाहिजे असा महादजींचा अंतःस्थ हेतू होता. पेशवे दरबारांत असलेलें नानांचें वर्चस्व त्यांना खपत नव्हतें. यावरूच या दोघां महापुरुषांमध्यें विलक्षण तेढ निर्माण झाली होती. वास्तवीक मराठयांचे हे दोघेहि आधारस्तंभ होते. परंतु त्यांच्यांतच वैमनस्य उत्पन्न झालें आणि त्यांतूनच इतर सरदारांमध्येंहि बेबनाव वाढून मराठशाहीचें अतोनात नुकसान झालें ही गोष्ट विसरतां येत नाहीं.

उत्तरेंतील कामगिरी यशस्वी केल्यानंतर महादजी १७९२ मध्यें पुण्याला आले. तेथें आल्यावर त्यांनीं प्रथम दिल्लीच्या बादशहानें दिलेलीं वस्त्रें आणि राजचिन्हें पेशव्यांस अर्पण केलीं आणि श्रीमंताच्या पायाशीं बसून त्यांनीं आपली निष्ठाहि व्यक्त केली. या वेळीं मराठ्यांचा अंमल सतलज नदीपासून दक्षिणेंत तुंगभद्रा नदीपर्यंत अव्याहत चालला होता आणि त्यांना एकहि बलिष्ठ शत्रू उरला नव्हता. श्रीमंत सवाई माधवरावांची कारकीर्द अत्यंत भरभराटीची ठरली होती आणि विशेषतः शिंदे दक्षिणेंत आले त्यावेळीं मराठी साम्राज्यांत सर्वत्र आबादानी निर्माण झाली होती. या सर्व यशाचे मानकरी इतर अनेक असले तरी नाना व महादजी

या दोघांचींच नांवें इतिहास प्रमुखपणें जाणतो. महादजींनीं दिल्लीहून आणलेलीं बहुमानाचीं वस्त्रें देण्याचा समारंभ अतिशय थाटामाटांत आणि वैभवांत साजरा झाला. या समारंभानंतर केव्हां तरी एकदां महादजींनीं श्रीमंतांशीं एकांती बोलणें करून नानांच्या जागीं आपली नेमणूक करून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु सवाई माधवराव मोठे धोरणी होते. त्यांनीं शिंद्यांना आंजारून गोंजारून घेतलें व ‘ नाना आणि महादजी हे दोघे आपले दोन हात आहेत आणि त्यांच्यावरच आपल्या सर्व साम्राज्याची मदार आहे ’ असें गोड गोड बोलून हा प्रश्न मिटवून टाकला.

पुढें इ. स. १७९४ च्या फेब्रुवारी महिन्यांत पाटीलबाबा एकाएकीं नवज्वरानें आजारी पडले आणि त्यांना तारीख १२ फेब्रुवारी रोजीं वानवडी येथें देवाज्ञा झाली. त्यांना इतका अचानक मृत्यु येईल अशी कुणाचीहि कल्पना नव्हती. मराठी राज्याचा हा एक मोहरा अशारीतीनें काळानें हिरावून नेला. त्यामुळें मराठी राज्याची एक बाजूच पूर्णपणें खचली. पाटीलबाबांचें सबंध चरित्र अत्यंत उद्बोधक असेंच आहे. परंतु याठिकाणीं त्यांच्या रणनैपुण्याचाच परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

# आमचीं कांहीं प्रकाशनें

## कुमार व बालसाहित्य

| | | |
|---|---|---|
| विदर्भाचे मानकरी | अ. ना. देशपांडे | २–०० |
| शूरांची भूमी | वि. स. गवाणकर | २–५० |
| थोरांची लोकसेवा : पुष्प १ ले | ग. म. वैद्य | २–५० |
| थोरांची लोकसेवा : पुष्प २ रे | ग. म. वैद्य | २–५० |
| थोरांची लोकसेवा : पुष्प ३ रे | ग. म. वैद्य | २–५० |
| मुलांचे शिवाजीमहाराज | शं. रा. देवळे | १–२५ |
| साने गुरुजींचे जीवनप्रसंग | गोंधळेकर व प्रभु | १–०० |
| सावरकरांचे जीवनप्रसंग | घोरपडे व गोंधळेकर | १–२५ |
| भारताचे मानकरी माला | ( वीस पुस्तकांचा संच ) | १५–०० |
| मुलांचे छान छान विनोद | गोंधळेकर, प्रभु, घोरपडे | ०–६० |
| छान छान पशू | कुलकर्णी व गोंधळेकर | ०–६० |
| छान छान पक्षी | कुलकर्णी व गोंधळेकर | ०–६० |
| छान छान गोष्टी | भालचंद्र रानडे | ०–७० |
| छान छान गाणी | मुरलीधर कुलकर्णी | ०–७० |
| आणि शस्त्र जन्मले ( सचित्र शस्त्रांची माहिती ) | जोगळेकर व टोळ | १–०० |
| Stories of our land series | twelve books | 10–00 |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ...................... दि: ..............
... ...................... नोंद दि ..........

# आमचीं कांहीं प्रकाशनें

## प्रौढ साहित्य

| | | | |
|---|---|---|---|
| साधकाची वाटचाल | | ग. वि. तुळपुळे | ५–०० |
| बुद्ध, धर्म आणि संघ | | श्री. शं. खानवेलकर | ३–०० |
| मुस्लिम सण आणि संस्कार | | श्रीपाद जोशी | १–८० |
| चीनचे आक्रमण व गांधीवाद | | श्रीपाद जोशी | ३–५० |
| गाठ हिमालयाशी आहे | : कादंबरी | कृ. मु. उजळंबकर | ६–०० |
| हरी नारायण | कादंबरी | भीमराव कुलकर्णी | ५–०० |
| न्यायमूर्ती | कादंबरी | दा. न. शिखरे | ३–०० |
| साहित्यांतील विवेक | : संपादित टीकालेख | देशपांडे व जोशी | ४–०० |
| गद्यप्रासाद | : संपादित निबंधसंग्रह | अदवंत, कुलकर्णी | ३–५० |
| मराठी गद्यगौरव | : ” ” | रू. पां. पाजणकर | २-२५ |
| नवी क्षितिजें नवी दृष्टी | : शिक्षणविषयक | ग. वि. अकोलकर | ३–०० |
| Art of Autobiography | | D. G. Naik | 15-00 |
| वाङ्मयीन रसास्वाद | : टीकालेखसंग्रह | भीमराव कुलकर्णी | ५–०० |
| महाराष्ट्रलक्ष्मी | : संपादित काव्यसंग्रह | म. ना. अदवंत | ३–५० |
| झंपूर्झा | : ” ” | कुलकर्णी, कुलकर्णी | ४–०० |
| पत्रं पुष्पम् | : ” ” | निकुंब व कुलकर्णी | ३–०० |
| उघडि नयन | : संपादित काव्यसंग्रह | भ. श्री. पंडित | ६–०० |

| | | | |
|---|---|---|---|
| उर्मिला | काव्यसंग्रह | कृ. ब. निकुम्ब | ३–०० |
| रविंद्र काव्यदर्शन | | श्रीकांत गोगटे | २–५० |
| शिक्का कट्यार | ऐतिहासिक नाटक | य. ना. टिपणीस | २–०० |
| ती तशी नव्हती | सामाजिक नाटक | श्री. र. भिडे | १–८० |
| नाट्यचिकित्सा (सवाई माधवराव यांचा मृत्यू) | | काका सहस्रबुद्धे | २–०० |
| सं. सौभद्र नाट्यसमीक्षा | | वि. पां. दांडेकर | १–०० |
| ग्रंथालयशास्त्राची पांच सूत्रे | | कृ. मु. उजळंबकर | १–८० |

प्रकाशक :

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

१३२० शुक्रवार पेठ, पुणें २

REFBK C014431

REFBK-0014431